40

सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षाच्या होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्याल- यांच्या प्रवेश क्षमतेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्र.एमएमसी-१८०१/११६६/सीआर-२२३/२००१/शिक्षण-२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २९ जुन, २०००.

**वाचा:-** १ केंद्रीय होमिओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १२-३/९८ -सीसीएच(पीटी) ४५१०/ दि. १६.५. २००१.

२ केंद्रीय होमिओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १६-२/२२००१/ सीसीएच/३१४०, दि. ९.५.२००१.

३ केंद्रीय होमिओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १२-३/९८/ सीसीएच (पीटी)/४५००, दि. १.५.२००१.

४ केंद्रीय होमिओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १६-१४/२०००/ सीसीएच/३१०१, दि. ८.५.२००१.

५ केंद्रीय होमिओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १६-७/९८/ सीसीएच/३१६४, दि. ९.५. २००१.

६ केंद्रीय होमिओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १६-१२/२०००/ सीसीएच/१३३८, दि.२३.४, २००१.

**शासन निर्णय :-** केंद्रीय होमिओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ६ अन्वये खालील होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयांना सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षात प्रथम बी.एच.एम.एच. या अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्रात प्रवेश करण्यास मान्यता दिलेली आहे. शासन सदरहू संस्थांच्या नांवासमोर दर्शविण्यात आलेल्या क्षमतेचे विद्यार्थी प्रवेश करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे :-

| अ.क्र. | होमिओपॅथीक महाविद्यालयाचे नांव | सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षाची विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | समर्थ एज्युकेशन सोसायटीचे होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, सातारा | १०० |
| २ | वेणूताई चव्हाण होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर | ५० |
| ३ | किसान ज्ञानोदय मंडळाचे होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे | ७५ |



RECEIVED ON 111 | 2001 2002
ON 17/07/2001

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री.जगदगुरु पंचाचार्य होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर | ७५ |
| ५ | काकासाहेब म्हस्के होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, नागापूर, अहमदनगर | १०० |
| ६ | धन्वंतरी होमिओपॅथीक वैद्याकीय महाविद्यालय, नाशिक | ५० |

२. केंद्रीय होमिओपॅथी परिषदेने वरील अनुक्रमांक (३) येथील किसान ज्ञानोदय मंडळाचे होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे या संस्थेची विद्यार्थी क्षमता ७५ वरुन १०० एवढी केली आहे. ती शासनाने मान्य न करता त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे ७५ इतकीच निश्चित केली आहे.

३. वरील अनुक्रमांक (२) येथील वेणूताई होमिओपॅथी महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या बाबतीत मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेच्या निर्णयाच्या अधीन मान्यता देण्यात येत आहे.

४. सक्षम प्राधिकारी तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांनी सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षाचे होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश करतांना वरील प्रमाणे प्रवेश करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(भा.र.गावित)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली (पत्राने)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.(५ प्रती)
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक संचालक आयुर्वेद, मुंबई/पुणे/ नागपूर.
प्राचार्य, समर्थ एज्युकेशन सोसायटीचे होमिओपॅथीक वैद्याकीय महाविद्यालय, सातारा

Gr